# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता**
**मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणे बाबत प्रस्तावांची ई-निविदा मागविणे कामीमान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि. इतके आहे. मनपा कार्यक्षेत्रामध्ये ३४८ कि.मी. इतक्या लांबीच्या वेगवेगळ्या व्यासाच्या जलवाहिन्या ३० ते ३५ वर्ष जुन्या आहेत. सदर जलवाहिन्यांच्या निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

मनपाच्या कार्यक्षेत्रात दररोज व्हॉल्व नादुरुस्तीच्या, पाईपलाईन लिकेज, नळाद्वारे येणारे घाण पाणी, पाईपलाईन चोकअप इत्यादी प्रकारच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच सन्मा. नगरसेवक, सन्मा. नगरसेविका व नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते व पाणी पुरवठा सुरळीत ठेवावा लागतो. मनपा कार्यक्षेत्रामध्ये शांतीनगर, वऱ्हाळा जी एस आर, नारपोली जी.एस.आर., कामतघर, आझादनगर, एस.टी .स्टँन्ड ई.एस.आर, आय.जी.एम. ई.एस.आर., नागांव, नेहरु नगर, नवी वस्ती व कोंबडपाडा इत्यादी ठिकाणी झोन निहाय जलकुंभाद्वारे व बायपास जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा केला जातो. सदर झोन निहाय पाणी पुरवठा करणाऱ्या व्हॉल्व पुर्णतः खराब झाल्यास किंवा बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्ती करणे किंवा आवश्यक असल्यास नविन व्हॉल्व बसविणे गरजेचे असते तसेच शहरातील मुख्य वितरण वाहिन्या नादुरुस्त होवून गळती झालेस तातडीने जलवाहिनी दुरुस्तीकामी साहित्याची आवश्यकता भासते. सद्या मनपाच्या भंडारगृहात जलवाहिनी दुरुस्ती साहित्य (उदा. स्पेशल्स, व्हॉल्व, टी, रेडूसर, फ्रैन्ड, जीपी जॉईन्ट व इतर सुटे किरकोळ साहित्य) उपलब्ध नसल्यामुळे आवश्यकते नुसार नविन साहित्य मागविणे आवश्यक आहे. तसेच गणमेटल,चेकनट,स्पींडलचे दर जिल्हा दरसुचीमध्ये उपलब्ध नसल्याने दरपत्रक मागवुन सदरचे दर बाजार भावाप्रमाणे घेण्यात आलेले आहेत.

मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणे बाबतच्या कामांस दि.०३/०४/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणे बाबत प्रस्तावांची ई-निविदा मागविणे कामीमान्यता मिळणे बाबत.** | **रु. ९५,००,०००/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणे बाबत प्रस्तावांची ई-निविदा मागविणे कामाची निविदामहा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** १८४ **दिनांक :** ११ / ०४ / **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणे कामीची ई निविदा प्रसिद्ध करणेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहरमहानगरपालिका,भिवंडी.**

**विषय :- वार्षिक निविदा सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे.**

उपरोक्त विषयांन्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेतील वार्षिक निविदा सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे कामी प्रस्तावित असुन, पावसाळयात अतिवृष्टीमुळे तसेच वेळावेळी पाणीपुरवठा व इतर प्रयोजनार्थ रस्त्यांची दुरुस्ती करणेकामी व बांधकाम विभागाकडे निरनिराळया सणासुदीच्या काळात रस्त्यांची दुरुस्ती व खड्डे भरणे कामी मागणी होते. अशा प्रत्येकवेळी अंदाजपत्रक तयार करणे व त्याकामी निविदा प्रक्रिया करुन काम करुन घेणे ऐवजी संपुर्ण वर्षाकरीता (सन २०२३-२४) च्या आवश्यक त्या कामाकरिता वार्षिक निविदा मागविणे उचित होईल. त्यानुसार उपरोक्त विषयांकीत कामी बांधकाम विभागामार्फत खालील नमुद कामांचे प्रस्ताव तयार करणेत आलेले आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे. | ४९,९७,५४४/- |
| २ | प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे. | ४९,९८,५९०/- |
| ३ | प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे. | ४९,९८,५९०/- |
| ४ | प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे. | ४९,९३,६६८/- |
| ५ | प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणे. | ४९,८४,११५/- |
| | एकूण रक्कम रुपये | **२,४९,७२,५०७/-** |

**ठराव क्रं. :** १४३ **दिनांक :-** ११ / ४ /२०२३

प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्ती करणेकामी **रक्कम रु.२,४९,७२,५०७/-(अक्षरी रुपये दोन कोटी एकोणपन्नास लाख बहात्तर हजार पाचशे सात मात्रचे)** एकूण ०५ प्रस्ताव तयार करुन ई-निविदा मागविणेच्या मंजुरी करिता सादर करण्यात आलेले आहेत. सदर ०५ प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ २०२०/प्र.क्र.७१/(भाग२) नवि १४ दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये प्रशासकिय व आर्थिक ठराव करणेकामी मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

<u>प्रस्तावना</u> :-

**विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील शांतीनगर येथील शाळा क्रं.69,79,15,18,101,180,86,92,82,80 हया इमारतीमध्ये विदयार्थ्यांना बसण्याकरीता बँचेस पुरवणे.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील शांतीनगर येथील शाळा क्रं.६९,७९,१५,१८,१०१,१८०,८६,९२,८२,८० हया इमारतीमध्ये विदयार्थ्यांना बसण्याकरीता बँचेस पुरवणेकामी मा.आमदार तथा विधानसभा सदस्य श्री.रईस कासम शेख यांनी उपरोक्त शाळा इमारतीमध्ये बँचेस पुरवणे कामी दिनांक २५/०८/२०२२ रोजी धरणा आंदोलन केले होते. सदर ठिकाणी मा.उप-आयुक्त (शिक्षण), मा.शहर अभियंता, मा.उप-अभियंता,उपस्थितीत होते. त्यावेळी सदर ठिकाणाहुन मा.आमदार सो यांनी मा.आयुक्त सो यांच्याशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधुन वस्तुस्थिती लक्षात आणुन दिल्यानंतर मा.आयुक्त सो यांनी मा.आमदार साहेबांना उपरोक्त विषयांकीत नमुद शाळा मध्ये बँचेस पुरवण्यात येतील असे आश्वासित केले होते. तसेच मा.आयुक्त सो यांनी आढावा बैठकीमध्ये सदर शाळांमध्ये बँचेस पुरवणेकामी अंदाजपत्रक तयार करणेबाबत निर्देश दिले आहेत. उपरोक्त विषयांकीत शाळेतील मुख्याध्यापकांनी एकुण ९७७ बँचेसची मागणी केलेली असुन त्यापैकी २८२ बँचेस नुकतेच पुरवण्यात आलेले आहेत उर्वरित ६९५ पैकी ६३२ बँचेस पुरवणे कामीचे रक्कम ४९,९२,८००/- (अक्षरी एकोनपन्नास लाख ब्यांनवद हजार आठशे मात्र) इतक्या खर्चाच्या प्रस्तावास मा.आयुक्त तथा प्रशासक सो यांनी दि.२०/०३/२०२३ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदर प्रस्तावास प्रशासकीय,आर्थिक मंजुरी मिळणेकामी प्रशासकीय ठरावाकरीता सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- १४२ दिनांक :-०६/०४/२०२३

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील शांतीनगर येथील शाळा क्रं.६९,७९,१५,१८,१०१,१८०,८६,९२,८२,८० हया इमारतीमध्ये विदयार्थ्यांना बसण्याकरीता बँचेस पुरवणेकामीच रक्कम रुपये ४९,९२,८००/- (अक्षरी एकोनपन्नास लाख ब्यांनवद हजार आठशे मात्र) इतक्या खर्चाचा प्रस्ताव सादर केला असुन त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिनिशमनपा कार्यक्षेत्रातील शाळा क्रं.६९,७९,१५,१८,१०१,१८०,८६,९२,८२,८० हया इमारतीमध्ये विदयार्थ्यांना बसण्याकरीता बँचेस पुरवणेकामास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

CE

प्रस्तावना :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापुर्वी लहान मोठे नाले सफाई करणे कामी होणा-या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता मिळणे बाबत.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील सालाबाद प्रमाणे पावसाळ्या पुर्वी जेसीबी, पोकलन,डंपर व मजुर घेवुन लहान मोठे नाले सफाई करणे आवश्यक आहे जेणे करुन मान्सुन कालावधीत शहर क्षेत्रात कुठेही पाणी साचणार नाही.

प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बंदिस्त व उघडया स्वरुपाचे लहान मोठे-नाले असुन या नाल्या मध्ये मोठया प्रमाणात गाळ व केरकचरा साठलेला दिसुन येत असल्याने कनिष्ठ अभियंता,प्र.स.क्र.१ ते ५ यांचे कडुन प्राप्त झालेल्या अंदाजपत्रका नुसार सर्व लहान मोठे नाल्यांची एकुण लांबी व सफाईकामी लागणारा अंदाजित खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्र.स.क्र. | प्रस्तावित अंदाजपत्रक |
|---|---|---|
| १ | १ | रु.४३,९३,१८५/- |
| २ | २ | रु.४४,६५,०६८/- |
| ३ | ३ | रु.४४,७०,५५१/- |
| ४ | ४ | रु.४४,०४,४५३/- |
| ५ | ५ | रु.४२,७५,३८०/- |
| | एकुण | रु.२,१९,८८,६३७/- |
| मुख्यरोड लगत असलेले लहान गटर सफाई कामी (मुख्यरोड लगत असलेले सर्व लहान गटर)) | | रु.३४,५२,३३४/- |
| | एकुण | रु.२,५४,४०,९७१/- |

वरिल तौलोनिक तक्यात मध्ये प्रभाग समिती क्र.१ ते ५ येथील कनिष्ठ अभियंता यांना नाले सफाई कामी व मुख्यरोड लगत असलेले सर्व लहान गटर सफाई कामी रु.२,५४,४०,९७१/- इतका खर्च अपेक्षित असुन सन २०२३-२०२४ सालाच्या वार्षिक अंदाज पत्रकात पाणीपुरवठा विभाग येथील नाले सफाई मधुन गाळ काढणे या लेखा शिर्षका खाली रुपये २ कोटी ५० लक्ष तरतुद प्रस्तावित करण्यात आली असुन नाले सफाई कामी होणारा सादर केलेल्या खर्चा प्रमाणे रु.४,४०,९७१/- इतक्या खर्चास वाढ आहे.

सबब नाले सफाई कामी व मुख्यरोड लगत असलेले लहान गटर सफाई कामी प्रभाग समिती क्र.१ ते ५ येथील कनिष्ठ अभियंता यांनी सादर केलेल्या खर्चाप्रमाणे रु.२,५४,४०,९७१/- इतका खर्च येत असुन रु.२,५४,४०,९७१/- खर्चास मान्यता मिळावी तसेच रु.४,४०,९७१/- इतक्या वाढीव खर्चाची तरतुद नाले सफाई मधुन गाळ काढणे या लेखा शिर्षका मध्ये वाढ करणेस मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

दि.०६/०४/२०२३

प्रशासकिय ठराव क्र. ९४१

सन २०२३-२०२४ साला मध्ये प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाई कामी कनिष्ठ अभियंता,प्र.स.क्र.१ ते ५ यांचे कडुन प्राप्त झालेल्या अंदाजपत्रका नुसार अंदाजे खर्च रु.२,५४,४०,९७१/- खचार्स व रु.४,४०,९७१/- इतक्या वाढीव खर्च नाले सफाई मधुन गाळ काढणे या लेखा शिर्षका मध्ये वाढ करणेस मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१३अ)व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका सन २०२३-२०२४ साला मध्ये प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील नाले सफाई कामी कनिष्ठ अभियंता,प्र.स.क्र.१ ते ५ यांचे कडुन प्राप्त झालेल्या अंदाजपत्रका नुसार

अंदाजे खर्च रु.२,७४,४०,९७१/- खचार्स व रु.४,४०,९७१/- इतक्या वाढीव खर्च नाले सफाई मधुन गाळ काढणे या लेखा शिर्षका मध्ये वाढ करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**